# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २१.०७.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २०.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १६ ईसमांवर कारवाई करून ६,६०,२९२/—रू. चा मुद्द्देमाल जप्त केला आहे. जुगार कायद्याअन्वये ०२ केसेसमध्ये १६ इसमांवर कारवाई करुन ९०,५२०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, कलम १३५ मपोका कायद्यान्वये १३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४२६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,७४,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०७.२०२६ चे २१.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ३, पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत पेट्रोलींग करीत असता, हिताची ऐटीएम जवळ एक इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यास हटकले असता, तो पळण्याचे तयारीत असतांना त्यास ताब्यात घेऊन त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव देवेश चमन कर्मावत, वय २४ वर्षे, रा. गंगा जमुना परिसर, लकडगंज, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी धारदार चाकु किंमती अंदाजे ३००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**३) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगीरी :— चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

फिर्यादी सौ. प्रिती मंगेश काटेकर वय ३९ वर्ष रा. म्हेत्रे वस्ती, चिखली, पुणे हया पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, जोशी अपार्टमेंट, ब्लॉक क्र. २, गायत्री भोजनालय जवळ, प्रतापनगर येथे राहणारे त्यांचे भावाचे घरी आलेल्या होत्या. दिनांक २१.०५.२०२६ चे १०.३० वा. ते २२.०५.२०२६ चे ०३.४५ वा. चे दरम्यान, त्या घरात आराम करीत असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे भावाचे घराचे उघडया दारातुन

आंत प्रवेश करून, फिर्यादी यांनी सिमेंट रॅकमध्ये काढून ठेवलेले त्यांचे सोन्याचे मंगळसुत्र वजनी १२ ग्राम कि. ५५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन आरोपीस निष्पन्न केले. आरोपी नामे १) अर्जुन प्रभु सोळंकी वय २५ वर्षे, रा. आराधनी नगर, भांडेवाडी, नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्याने वर नमुद चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी २) हर्ष उर्फ एक्का महेंद्र रामटेके, वय २७ वर्ष, रा. खैरलांजी रोड, बुध्द नगर, तिरोडा, जि. गोंदीया याचेसह केल्याची कबुली दिली व गुन्हयातील मुद्येमाल आरोपी क्र. ३) संदीप भास्कर गुंफलवार, वय ३८ वर्ष, रा. मंगळवारी पेठ, उमरेड, नागपूर यास विक्री केल्याचे सांगितले. तसेच पाहिजे आरोपी क्र. २ याने दिनांक २९.०६.२०२६ रोजी सिंधी कॉलनी, खामला, नागपूर येथे घरफोडी करून, त्यातील सोन्याचे ब्रेसलेट वजनी ५ ग्राम व चांदीच्या वस्तु विकण्याकरीता दिल्याचे सुध्दा सांगितले. आणि ते सुदधा आरोपी क्र. ३ यास विकल्याचे सांगितले. आरोपी क्र. ३ याचे ताब्यातुन दोन्ही गुन्हयातील सोन्याची लगड एकूण २३ ग्राम १० मिलीग्राम कि. २,५०,०००/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीकडुन ०२ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव राणा प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, पोहवा. मनोज टेकाम, रवि अहीर, प्रितम यादव, स्वप्निल खोडके, शरद चांभारे, अजमत शेख व नितीन बोपुलकर यांनी केली.



**<u>४) वाठोडा पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या १५ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २०.०७.२०२६ चे १५.३० ते १५.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत मॉ गंगा सेलिब्रेशन जवळील साई सावजी हॉटेल मागील मोकळया जागी काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) कार्तिक सुनिल सपाटे, वय २६ वर्षे, रा. रमणा मारोती, नंदनवन २) मंगेश विठ्ठल खंडारे, वय २५ वर्षे, चैतन्येश्वर नगर, वाठोडा ३) शहबाज कलाम शेख, वय २८ वर्षे, गरीबनवाज चौक, वाठोडा ४) अजिंक्य देवलाल लोढे, वय ३२ वर्षे, श्रीराम नगर, वाठोडा ५) आशिष कृष्णराव काळे, वय ४० वर्षे, भरतवाडा, पारडी, ६) राजेंद्र सेवकराम जांगळे, वय २५ वर्षे, सुरजनगर, भांडेवाडी ७) अर्षद शेख नदीम शेख,

वय २५ वर्षे, प्लॉट क्र. ८, हनुमान नगर, उमरेड रोड ८) अमोल प्रमोद सोंदरकर, वय २८ वर्षे, रा. खुंडे नगर, खरबी ९) मंगेश चंद्रशेखर मेहर, वय २२ वर्षे, रा. पार्वतीनगर, वाठोडा १०) अनुराग राजु हिरणखेडे, वय १९ वर्षे, रा. शिव छत्रपती नगर, खरबी ११) राहुल अनिल जाधव, वय ३२ वर्षे, रा. श्रीरामनगर, खरबी १२) ओंकार प्रकाश पराते, वय २४ वर्षे, रा. खरबी टी पॉईन्ट, वाठोडा १३) अंशुल उरकुडा चिंचुलीकर, वय २८ वर्षे, रा. ओम साईनाथ नगर, दिघोरी १४) प्रतिक प्रमोद तल्हार, वय २५ वर्षे, रा. श्रीरामनगर, खरबी १५) पारस सुरेश चौधरी, वय २२ वर्षे, रा. खरबी, वाठोडा, नागपूर हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख १२,३२०/–रु., ताश पत्ते, १० वेगवेगळया कंपनीचे मोबाईल व ईतर साहीत्य असा एकुण ९०,४००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे कलम १२(अ) महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. श्री प्रमोद पोरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. स्वप्निल राऊत, अतुल पवार, सागर गायकवाड, कृष्णा साळुंके, पोहवा. कैलास चकोले, सुनिल कुकवास, पोअं. चेतन ऊतखेडे, सुरेंद्र बेदुरकर, जितेंद्र मनगटे व कैलास श्रावणकर यांनी केली.

## (गुन्हे)

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर :– फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी निजामुद्दीन महमुद अहमद, वय ५२ वर्ष, रा. मकान नं. २०४, अबु मिया मस्जिद जवळ, अन्सार नगर, मोमीनपुरा, तहसील नागपूर यांना प्लॉट खरेदी करावयाचा असल्याने, त्यांनी दिनांक ०१.११.२०२० चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील मौजा वांजरा येथील प.ह.नं. १७, खसरा क्र. ५५/२, शिट क्र. ८२७/७१, सिटी स्लॅब नं. (२४५) १६ या शेतजमीनीमध्ये टाकलेल्या ले–आऊटमधील प्लॉट क्र. ३५, आराजी ५००० चौफुट हा पसंत आल्याने, आरोपी क्र. १) नित्यानंद प्रेमानंद रामटेके २) चेतानंद प्रेमानंद रामटेके, दोन्ही रा. प्लॉट क्र. १४९, लघुवेतन कॉलनी, यशोधरानगर ३) अंशु पुरुषोत्तम बजाज, रा. प्लॉट क्र. २२, दीनदयाल नगर, नागपूर ४) राजेश हंसराज पंजवानी, रा. प्लॉट क्र. १४९, देविका हर्ष, कल्पना नगर, नागपूर ५) शब्बीर अहमद नुर अहमद, रा. घर क्र. ९, अबुमिया मस्जिद जवळ, अन्सार नगर, नागपूर ६) मोहम्मद युनुस मोहम्मद इद्रीस अन्सारी, रा. मोमीनपुरा, हैदर रोड, सिद्यीकी कॉम्प्लेक्स, तहसील, नागपूर यांनी संगनमत करुन नमुद शेतजमिनीचे मालक असलेबाबत बनावट विक्रीपत्र व सातबारा फिर्यादी यांना दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. आरोपींनी दिनांक ३१.१२.२०२३ पावेतो फिर्यादी यांचेकडून प्लॉटची रक्कम ४५ लाख रुपये घेऊन, फिर्यादी यांना कोणतेही कागदपत्रे करुन दिली नाहीत. फिर्यादी हे विक्रीपत्र करण्यासाठी संबंधीत कार्यालयात गेले असता, नमुद शेती ही आरोपीतांचे नसल्याचे माहित झाल्याने त्यांनी आरोपीतांना पैसे परत मागितले. आरोपींनी फिर्यादीस कोणतीही रक्कम परत केली नाही. आरोपींनी संगनमत करून जमीनीचे बनावट कागदपत्रे दाखवुन, फिर्यादी सोबत करारनामा करून, रक्कम घेवुन, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून, फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. रविकुमार सावतकर ८७८८११०७८४ यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०,४६८,४७१,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**<u>पोलीस ठाणे जुनी कामठी</u> :–** कु. दिव्या दिलीप श्रीवास, वय १९ वर्षे, रा. हमालपुरा, गायत्री मंदीर जवळ, कामठी, नागपूर ही दिनांक २०.०७.२०२६ चे १५.१५ वा. पासुन पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील राहते

घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट, केस–काळे, अंगात– क्रिम रंगाचा टॉप व काळ्या रंगाचा लोअरपॅन्ट, पायात ब्राऊन रंगाचे सॅन्डल घातलेले आहे. भाषा– हिंदी बोलते. ओळख– मानेवर उजव्या बाजुस मस्सा आहे, तसेच हनुवटीवर जुने माराचे निशान आहे.



कु. दिव्या

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**